*"SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY"*

# PRAYAS YOUTH FORUM & SOCIAL RESEARCH FOUNDATION.

**WITH**

***K.K WAGH INSTITUTE OF ENGINEERING EDUCATION & RESEARCH, NASHIK.***

**Reg. No: IN9N0/1409/10 MAH/1245/10**

## NASHIK

## PRAYAS REPORT

## ACADEMIC YEAR 2015-16

**Reg. No: IN9N0/1409/10 MAH/1245/10**

# ABOUT PRAYAS

**"PRAYAS"** means Endeavour. We endeavor to help others. Prayas Youth Forum & Social Research Foundation is a registered Social Service NGO with Non-Political, Non-Religious & Non-Regional view.

Incepted in the year 2008, with a mission to promote self-awareness among the youth, Prayas is an organization which believes in creating responsible Youth who will build India of tomorrow.

# VISION

Our hopes and efforts are directed towards achieving a versatile, multifaceted & Sustainable Development of society; by channelizing dynamic youth power & bridging the gap between rural and urban society.

# MISSION

• To promote education as well computer literacy in remote areas.

• To aid in youth personality development and provide career counseling.

“The best way to find yourself is to lose yourself in the service of others.” -Mahatma Gandhi.

If we seek to bring a change in the society, we should be a part of it. Youngsters can be the vital catalyst and bring about this change in no time. At Prayas, we strive to make this idea a reality.

# ACTIVITIES

## PAPER BAG CAMPAIGN:

On the occasion of first Parvani of Kumbh Mela Nashik, around 150 volunteers participated in Paper Bag Campaign to spread a message of “Avoiding usage of Plastic Bags” and save the environment on 23rd of August 2015.

They made around 1500 Paper Bags which were distributed among shopkeepers and people in Sadhugram, Tapovan (Panchavati), Nashik.









## SANVARDHAN

Ganesh festival is the most popular and most celebrated festival in Maharashtra. People tend to use Ganesh idols made from POP (Plaster Of Paris) and do the Visarjan of this idols in natural water bodies which has harmful effects on the water bodies as well as the environment.

To tackle this problem and create awareness among people about the ill effects of POP and poisonous paints used to make idols around 40 volunteers participated in Nashik Municipal Corporation's Clean Godavari mission through their event Sanvardhan on 27th September 2015. Over 1800 Ganesh idols made from POP were collected and handed over to NMC during the event.





**News Coverage:**



पर्यावरणप्रेम | अनेक अडचणींवर मात करून विद्यार्थी स्वयंसेवकांनी राबवला उपक्रम

# जिद्दीचे 'संवर्धन'... १८०० मूर्तींचे संकलन

प्रतिनिधी | नाशिक

गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण नाशिकमध्ये पर्यावरण रक्षणाच्या चळवळीने जोर धरला असतानाच विद्यार्थ्यांच्या 'संवर्धन' या संस्थेने घारपुरे घाट आणि रामवाडी पूल परिसरात १८०० मूर्तींचे संकलन केले. या ठिकाणी विसर्जनासाठी मोठे कारखाने आणि मंडळांची रीघ लागलेली असताना विद्यार्थी स्वयंसेवकांनी हे आव्हान पेलले.

मात्र, हा विभाग नाशिकमधील जुन्या रहिवासी विभागांपैकी असल्याने येथे विसर्जनाचाच आग्रह धरणाऱ्या नागरिकांचे प्रमाण अन्य ठिकाणांपेक्षा काहीसे जास्तच असते. संवर्धनच्या विद्यार्थ्यांच्या अनुभवावरून येथे लोकांचे प्रबोधन करण्यासाठी अथक प्रयत्न करावे लागले. या सगळ्या अडचणींवर मात करत पोलिस यंत्रणा आणि नाशिक महानगरपालिकेच्या मदतीने या विद्यार्थ्यांनी मूर्ती संकलनाचा उपक्रम जिद्दीने आणि धडाडीने राबविला. 'संवर्धन'मध्ये ६० स्वयंसेवकांचा सहभाग होता. त्यात २० मुले आणि ४० मुलींचा सहभाग होता.

या उपक्रमात क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रयास फाउंडेशन, आनंद निकेतन आणि गुरू गोविंद सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. तसेच स्नेहा वासवानी, रोहन पोरजे, मुक्ता कावळे, दुर्गेश जोशी, रवी वासवानी, ईशान गुजराथी यांच्यासह अनेक पर्यावरणप्रेमी विद्यार्थ्यांनी या उपक्रमात हिरीरीने भाग घेतला.

नाशिकच्या संवर्धन संस्थेला गणेशमूर्ती दान करताना मंडळाचे कार्यकर्ते.

**बॉश, महिंद्रा कंपन्यांच्याही मूर्ती दान...**

'संवर्धन'कडे पाच फुटांच्या चार, तर चार फुटांपर्यंतच्या सहा मूर्तींचे संकलन झाले. त्यामध्ये बॉश, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कामगार संघ यांच्यासह माजी आमदार नितीन भोसले यांच्याही मूर्तींचा समावेश होता.



# गणेशमूर्ती संकलनासाठी सामाजिक संस्थांची आघाडी

नाशिक : प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या प्रमाणावर नाशिकमधील सामाजिक व सेवाभावी संस्था आणि शाळा-महाविद्यालयांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन मूर्ती संकलनासाठी आघाडी घेतली. यामुळेच यंदा विक्रमी अशा स्वरूपात मूर्तींचे दान होऊ शकले.

गेल्या पाच ते सहा वर्षांपासून महापालिकेच्या वतीने मूर्ती दान व निर्माल्य संकलन करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. आता या मोहिमेला एक मोठे स्वरूप प्राप्त झाल्याने त्यास आता एक चळवळीचे रूप प्राप्त होऊ लागले आहे. महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या ५९ मूर्ती संकलन आणि निर्माल्य जमा करण्यासाठी उभारण्यात आलेल्या केंद्रांवर सकाळपासूनच शहरातील विविध सामाजिक, सेवाभावी आणि शैक्षणिक संस्थांबरोबरच औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांच्या कार्यकर्त्यांनी हजेरी लावली होती. दरवर्षीप्रमाणे यंदा ही अभाविपच्या माध्यमातून सलग आठव्या वर्षीही गणेशमूर्ती संकलन मोहीम राबवली गेली. सकाळी ११ च्या सुमारास रामकुंडच्या बाजूला सुरू झालेला उपक्रम रात्री आठ व त्यानंतर रामकुंड परिसरातील सर्व मूर्ती मनपाकडे सुपूर्द होईपर्यंत रात्री ११ वाजेपर्यंत सुरू होता. १२ तासांत आठ हजारांपेक्षा जास्त गणेशमूर्ती संकलित करण्यात आल्या. मोहिमेत अभाविपसोबत विविध संस्था, महाविद्यालयांचे १५० हून अधिक विद्यार्थी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**या संस्थांचा होता सहभाग**

गणेशमूर्ती संकलनासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेत स्वप्नपूर्ती फाउंडेशन, शीतल अकॅडमी, जल्लोष ग्रुप, संदीप फाउंडेशन ग्रीन कुंभ ग्रुप, पंचवटी कॉलेज ग्रुप, भोसला महाविद्यालय ग्रुप, बिटको कॉलेज, आरंभ महिला महाविद्यालय, एचपीटी कॉलेज ग्रुप, व्ही. एन. नाईक कॉलेज ग्रुप, एनबीटी लॉ कॉलेज ग्रुप, एनडीएमव्हीपी कॉलेज ग्रुप, नवनाथ पंथ सामाजिक संस्था, पीव्हीजी कॉलेज ग्रुप, एमईटी कॉलेज ग्रुप अशा विविध संस्था व कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

**संवर्धनतर्फे अठराशे मूर्ती**

संवर्धन सामाजिक सेवा संस्थांच्या वतीने रामघाट आणि घारपुरे घाट परिसरात गणेशमूर्ती संकलन करण्यात आले. एकूण १८०० मूर्ती संकलित करण्यात आल्या. एकूण ६० तरुण-तरुणींनी या उपक्रमात सहभागी होत ही मोहीम फत्ते केली. यात सई कावळे, स्नेहा वासवानी, रोहन पुजारे, हर्षदा कुंभकर्ण, दुर्गेश जोशी, मुक्ता कावळे, रवि वासवानी, चेतन सोनजे, इशान गुजराथी आदींनी सहभाग घेतला.

नाशिक : संवर्धन या सामाजिक संस्थेच्या वतीने अठराशे मूर्तींचे संकलन करण्यात आले. या मोहिमेत सहभागी झालेले तरुण-तरुणी.

(छायाचित्रे : हेमंत घोरपडे)

# ANNUAL CAMP 2016 :

## ABOUT VILLAGE

Peth is a Taluka in Nashik District of Maharashtra State, India. Peth Taluka Head Quarters is Peth town. It belongs to Khandesh and Northern Maharashtra region. It belongs to Nashik Division. It is located 50 KM towards North from District headquarters Nashik. 179 KM from State capital Mumbai towards South.

Peth Taluka is bounded by Kaprada Taluka towards west, Dindori Taluka towards East, Trimbak Taluka towards South, and Surgana Taluka towards North. Nashik City, Dharampur, India City, Ozar City, Silvassa City are the nearby Cities to Peth.

Peth consist of 200 Villages and 73 Panchayats. Kelvihir is the smallest Village and Peint is the biggest Village. It is in the 563 m elevation (altitude).

## Demographics of Peth Taluka:

Marathi is the Local Language here. Also People Speaks Hindi, Ahirani And Bhili. Total population of Peth Taluka is 96,774 living in 17,612 Houses, Spread across total 200 villages and 73 panchayats. Males are 48,580 and Females are 48,194.

## VILLAGES COVERED

| Sr. No. | Village Name | Sr. No. | Village Name |
|---|---|---|---|
| 1 | Aad (B) | 12 | Jambvihir |
| 2 | Bhaygaon | 13 | Karanjali |
| 3 | Borvat | 14 | Kotambi |
| 4 | Deogaon | 15 | Kohor |
| 5 | Gavandhapada | 16 | Khirkade |
| 6 | Hatrundi | 17 | Savalghat |
| 7 | Tilbhat | 18 | Patali |
| 8 | Ubhidhond | 19 | Inambari |
| 9 | Shinde | 20 | Nirgude |
| 10 | Bardapada | 21 | Pawarpada |
| 11 | Umbarpada | | |

# PRAYAS 2016 REPORT

| Sr. No. | Title | Count |
|---|---|---|
| **1** | Number of Volunteers. | 66 |
| **2** | Number of Schools Covered. | 26 |
| **3** | Number of Students benefited through Computer Literacy. | 4500+ |
| **4** | Number of Students Participated in Drawing Competition. | 3500+ |
| **5** | Number of Students benefited through Career Counseling. | 800+ |
| **6** | Number of Prizes given. | 400+ |
| **7** | Number of Trees Planted. | 10 |


## 1. Inauguration Program






















Opening Ceremony at Govt. Ashram School Borvat by Mr. Bhaskarji Gavit & Deputy Chairman Mr. Maheshji Tople Panchayat Samiti Peth.

## 2. Street Play













Street Play was performed in Ashram School, Borvat and Village Borvat with a message of "Beti Bacho, Beti Padhao", "Swach Bharat", & "Health awareness".

## 3. Computer Literacy Sessions
















Students were taught with the basics of Computer and live demonstration of laptop and also its application in day to day life.

## 4. Career Counseling Session











Student from 9th & 10th standard were guided with career opportunities after 10th and 12th by experts from IT Industry as well as MPSC Students.

## 5. Drawing Competition















Drawing competition were being conducted for standard 1st to 7th for finding the hidden talent among 3500 + students.

## 6. Sports Competition













Sports Competition like Kabaddi, Kho-Kho and Running were organised.

More than 12 Schools Participated.

## 7. Prize Distribution Ceremony













More than 400+ Prizes awarded for various events like Drawing Competition, Elocution Competition, Essay Competiton and sports Competition.

## 8. Library Donation










With the help of **"FinIQ Consulting India Pvt. Ltd."** Library was setup in 5 Zilla Parishad Schools namely Schools like Borvat, Deogaon, Inambari, Hatrundi & Khirkide.

## 9. PRAYAS NEWS CORNER

# वाघ अभियांत्रिकीचा आश्रमशाळांमध्ये संगणक साक्षरतेचा 'प्रयास'

प्रतिनिधी, नाशिक

**तंत्रज्ञानाच्या या** युगात संगणकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येक शाळेत संगणकाचे शिक्षण दिले जात आहे. परंतु आदिवासी विभागात आजही संगणक माहिती नाही. अनेक विद्यार्थी संगणक शिक्षणापासून वंचित आहेत. शहरी आणि ग्रामीण या भागातील दरी बुजविण्यासाठी येथील क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मदतीने 'प्रयास'च्या स्वयंसेवकांनी एक पाऊल पुढे टाकत पेठ परिसरात संगणक साक्षरता अभियान राबविले.



**नाशिक येथील क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी लॅपटॉपद्वारे संगणकाचे शिक्षण देताना.**

पेठ परिसरातील २६ शाळांमध्ये 'प्रयास २०१६' हे पाचदिवसीय निवासी शिबीर घेण्यात आले. शिबिरांतर्गत करंजाळी केंद्र आणि कोहोर केंद्र यामधील जिल्हा परिषद शाळा आणि दोन शासकीय आश्रमशाळांमध्ये मार्गदर्शन करण्यात आले. सुमारे साडेचार हजार विद्यार्थ्यांनी संगणक प्रशिक्षण घेतले. सर्व स्वयंसेवकांनी संगणक साक्षरतेसोबतच करिअर मार्गदर्शन, वैज्ञानिक खेळ, वैदिक गणित तसेच चित्रकला स्पर्धाही आयोजित करण्यात आली होती. गावागावामध्ये पथनाट्य सादर करण्यात आले. त्यात स्त्रीशिक्षण, स्वच्छतेचे महत्त्व, स्त्रीभ्रूण हत्या, साक्षरता या विषयावर प्रकर्षाने प्रकाश टाकण्यात आला. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना शालेपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. पाच शाळांमध्ये ग्रंथांची मदत करण्यात आली. शिबिराच्या शेवटच्या दिवशी सर्व शाळांसाठी निबंध, वक्तृत्व, कबड्डी, खो-खो, धावणे या स्पर्धा 'प्रयास २०१६ क्रीडा महोत्सव' या अंतर्गत घेण्यात आल्या. शाळांना क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले.

'प्रयास २०१६' च्या संगणक साक्षरता शिबिरात प्राचार्य केशव नांदूरकर, प्रा. नानासाहेब गुरूळे, राजमुद्रा क्रीडा मंडळाचे अध्यक्ष स्वप्निल पाटील आदी उपस्थित होते. या शिबिरास पेठचे उपसभापती महेश टोपले यांचे सहकार्य लाभले. शिबिराचे आयोजन चेतन नारखेडे, प्रफुल्ल पाटील, योगेश शेळके, परेश पाटील यांनी केले. स्पर्धांमध्ये सुमारे हजार विद्यार्थ्यांनी भाग घेतला. पाच शाळांना सुमारे ५०० पुस्तके शाळा ग्रंथालयांसाठी देण्यात आल्या. अश्विनी पाटील यांनी ग्रंथालय उभारणीस ५० हजार रुपयांची मदत केली.

# पाड्यांवरील विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर शिक्षणाचे धडे

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

पारंपरिक पध्दतीने शिक्षण घेणाऱ्या अन् सामान्य सुविधांपासूनही वंचित असणाऱ्या पेठ तालुक्यातील आदिवासी पाड्यांवर 'प्रयास' या समाजसेवी संस्थेने कॉम्प्युटर शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आहे. प्रयासच्या कॉम्प्युटर ट्रेनिंग अन् इतर प्रशिक्षणाच्या उपक्रमांना पेठ तालुक्यातील २६ शाळांचा प्रतिसाद लाभला.



आदिवासी पट्ट्यातील विद्यार्थ्यांना कॉम्प्युटरचे योग्य शिक्षण मिळत नसल्याचे प्रयासचे निरीक्षण होते. यानुसार पेठ तालुक्यात करंजळी आणि कोहोळ या दोन केंद्रांसह २ आश्रमशाळांतर्गत २५ शाळांपर्यंत प्रयासचे कार्यकर्ते पोहचले. कॉम्प्युटर म्हणजे काय? या प्रश्नापासून तर इंटरनेटद्वारे ग्लोबल प्लॅटफॉर्म कसा मिळवाल, या प्रश्नापर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या शंकांचे या कार्यकर्त्यांनी निरसन केले. सुमारे साडेचार हजार विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. संगणक साक्षरतेसोबतच करिअर मार्गदर्शन, वैज्ञानिक खेळ, वैदिक गणिते, पथनाट्य सादरीकरण, चित्रकला स्पर्धा आदी उपक्रमांचाही यात सहभाग होता. पथनाट्यांमध्ये सामाजिक विषयांवर सादरीकरण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. याशिवाय पाच शाळांमध्ये ग्रंथ उपलब्ध करून देण्यात आले. यात प्रत्येक शाळेस सुमारे ५०० पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. प्रत्येक या पाच दिवसीय उपक्रमाच्या अखेरच्या दिवशी सर्व शाळांमध्ये निबंध, वक्तृत्व यांसह खो खो, धावणे आदी क्रीडा स्पर्धाही आयोजित करण्यात आल्या. शिबिरात प्राचार्य केशव नांदूरकर, प्रा. नानासाहेब गुरूळे, स्वप्नील पाटील यांनी प्रयत्न केले.

# बोरवठ येथे संगणक साक्षरता अभियान

## प्रयास संस्था : शाळांना पुस्तके, खेळ साहित्य भेट

पेठ : पुणे येथील प्रयास युथ फोरम व सोशल रिसर्च फाउंडेशनच्या वतीने पेठ तालुक्यातील बोरवठ व परिसरातील प्राथमिक शाळांमध्ये संगणक साक्षरता अभियानासह विविध शैक्षणिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच शाळांच्या वाचनालयासाठी पुस्तके व खेळ साहित्य भेट देण्यात आले.

जि. प. सदस्य भास्कर गावित, उपसभापती महेश टोपले यांच्या हस्ते स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. प्रयासच्या सदस्यांनी परिसरातील बोरवठ, करंजाळी, सावळघाट, कोटंबी, कोहोर आदि गावांतील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान दिले व विविध स्पर्धा घेऊन मुलांना पारितोषिके वाटप केली.

अखेरच्या दिवशी बोरवठ येथे धावणे, चित्रकला, रांगोळी, निबंध, कबड्डी, खो-खो आदि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विजयी स्पर्धकांना उपसभापती महेश टोपले, के. के. वाघ शिक्षण संस्थेचे प्रा. गुरुळे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष स्वप्नील पाटील यांच्या हस्ते पारितोषिके वाटप करण्यात आली, तर बोरवठ येथील शासकीय आश्रमशाळेतील मुलांसाठी क्रीडा साहित्य भेट देण्यात आले. यावेळी प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष रामदास शिंदे, आदिवासी शिक्षक संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र भोये, मुख्याध्यापक भदाणे, प्रकाश भामरे, प्रयास संस्थेचे चेतन नारखेडे, प्रफुल्ल पाटील, योगेश शेळके, परेश पाटील, रमेश थोरात, योगेश राऊत यांच्यासह परिसरातील शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. (वार्ताहर)



पथनाट्य सादर करताना प्रयास संस्थेचे सदस्य.

### कलापथकातून समाजजागृती

प्रयास संस्थेच्या विद्यार्थ्यांनी पेठ तालुक्यातील गावागावांत जाऊन विविध प्रकारच्या पथनाट्यातून समाजजागृती केली. यामध्ये मुलगी वाचवा, सर्वांना शिक्षण, संगणक साक्षरता, स्त्री-पुरुष समानता आदि संदेश दिले.

# संगणक साक्षरतेसाठी 'प्रयास' तर्फे अभियान

। नाशिक ।

तंत्रज्ञानाच्या या युगात संगणकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येक शाळात संगणकाचे शिक्षण प्राधान्याने दिले जात आहे. परंतु आदिवासी विभागात आजही संगणकाची व्याख्यासुध्दा पोहोचू शकली नाही. आजही अनेक विद्यार्थी संगणक शिक्षणापासून वंचित आहेत. शहरी भाग आणि ग्रामीण या दरम्यान जी दरी आहे त्यावर पुल बांधण्यासाठी क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मदतीने 'प्रयास' च्या स्वयंसेवकांनी एक पाऊल पुढे टाकत संगणक साक्षरता अभियान राबविले.

पेठ परिसरातील २६ शाळांमध्ये 'प्रयास-२०१६'चे पाच दिवसीय निवासी शिबिर आयोजित केले होते. या शिबिरांतर्गत करंजाळी केंद्र आणि कोहोर केंद्र यामधील जिल्हा परिषद शाळा आणि २ शासकीय आश्रमशाळामध्ये मार्गदर्शन करण्यात आले. सुमारे साडेचार हजार विद्यार्थ्यांनी संगणक प्रशिक्षण घेतले. सर्व स्वयंसेवकांनी संगणक साक्षरतेसोबतच करिअर मार्गदर्शन, वैज्ञानिक खेळ, वैदिक गणिते त्याचबरोबर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. गावागावामध्ये पथनाट्य सादर करण्यात आले. यात स्त्रीशिक्षण, स्वच्छतेचे महत्त्व, स्त्रीभ्रूण हत्या, साक्षरता या विषयावर प्रकर्षाने प्रकाश टाकण्यात आला.

विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर पाच शाळामध्ये ग्रंथ उभारणी करण्यात आली. शिबिराच्या शेवटच्या दिवशी सर्व शाळांच्या निबंध, वक्तृत्व, कबड्डी, खो-खो, धावणे या स्पर्धा प्रयास २०१६ क्रीडा महोत्सव या अंतर्गत करण्यात आल्या होत्या. विशेष पारितोषिके सुध्दा देण्यात आली. शाळांना खेळाचे साहित्याचे वाटप करण्यात आले.

प्रयासची अखंड वाटचाल यापुढेही अशीच चालू राहिल. सामाजिक जागृती आणि संगणक साक्षरतेसाठी जपलेला हा आपला प्रयास अविरतपणे आपल्या लहान भाव-भावंडासाठी सतत यापुढेही चालू राहिल.

'प्रयास-२०१६' च्या संगणक साक्षरता शिबिरात प्राचार्य केशव नांदुरकर, प्राध्यापक नानासाहेब गुरुळे, राजमुद्रा क्रीडा मंडळाचे अध्यक्ष स्वप्नील पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरास मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य महेश टोपले यांचे लाभले. या शिबिराचे आयोजन व नियोजन चेतन नारखोडे, प्रफुल्ल पाटील, योगेश शेळके व परेश पाटील या स्वयंसेवकांनी केले होते. या सोबतच ७० स्वयंसेवकांचा सहभाग होता. या पाच दिवसीय शिबिरास बोरवठ गावातील विद्यार्थी व पालकांनी देखील उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



## **CLEANING TREK** :

Excessive usage of Plastic is degrading our environment day by day. The plastic used is not disposed properly. This is seen everywhere nowadays. This is adversely affecting our Mountains, Historical as well as Cultural heritages.

To create awareness among people and to spread the message of reducing and properly disposing plastic waste, around 23 volunteers arranged a Cleaning trek on 13th March 2016 at Bramhagiri, a Cultural heritage at Tryambakeshwar, near Nashik. Around 40 kg of Plastic waste was collected from the top of the mountain and disposed of properly in the town of Tryambakeshwar.







## BLOOD DONATION :

A Blood Donation drive was organized on 16th March 2016, conveying importance of blood donation. Around 50 volunteers participated in the drive collecting over 130 bags of blood, with the support of Civil Hospital Nashik.







# SPONSORS

## FinIQ Consulting India Pvt. Ltd - Library Donation

FinIQ
The Financial Engineering Company

**Special Thanks to K.K Wagh Institute of Engineering Education and Research, Nashik & Panchyat Samiti Peth.**

| SR. NO. | SPONSORER | SPONSORSHIP |
|---|---|---|
| 1. | Mr. Shreedhar Gokhale | Stationary |
| 2. | Mr. Gaurav Mahale | Stationary |
| 3. | Mr. Ravindra B. Pathak | Stationary |
| 4. | Mr. Satish Sonawane | Stationary |
| 5. | Prof. Archana Patil & Vishnu Gangwani | Prizes |
| 6. | Mr. Sunetra Sardar | Stationary |
| 7. | Mr. Santosh Pillai | Stationary |
| 8. | Mr. Jogendra Koli & Mrs. Shamala Thanekar | Stationary |
| 9. | Mr. Rahil Rajwani and Mr. Zoheb Rajwani | Stationary |
| 10. | Mr. Vaibhav Jain & Mr. Amit Chaudhari | Stationary |
| 11. | Mrs. Mayuri Uttamchandani & Mrs. Sneha Waswani | Sports Kit |
| 12. | Mrs. Sumatilal Bagde | Stationary |
| 13. | Mr. Kailas Mainde (K.M. Group Nashik road) | Prizes |
| 14. | Luya Traders Nashik Road | Food Item |
| 15. | Mr. Gopinath Jadhav | Stationary |
| 16. | Mr. Sachin Pawar & Mr. Nilesh Saha | Stationary |
| 17. | Mr. Namdev & Mr. Jayawantabai Gangurde. | Stationary |
| 18. | Mr. Rajabhau Gangurde | Stationary |
| 19. | Mrs. Nileshwari Vispute | Books |

# FORWARD



"When ordinary people find themselves in extraordinary situation, they act in extraordinary ways"

Again Prayas Youth Forum has performed extraordinary work for year 2016 which is another year of service to humankind in the field of education as providing Computer Literacy in rural areas.

The image of Prayasian and how it is portrayed determines our prestige in the community and rest of the world, which in fact translates into the amount of support we may receive from the public in current as well as in upcoming years.

We are really excited to let you all know that the experiences and learning of Prayas Volunteers is so inspiring that it's automatically building an individual with social minds and defiantly that individual will serve the nation through out there life.

I express my gratitude towards our volunteers and sponsor's whose contribution to our service is priceless.

Mr. Swapnil Chavan.
Trustee.
Prayas Youth Forum & Social Research Foundation.